# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## जाहिर निविदा सुचना श्वान निर्बिजीकरण व लसीकरण

## (दुसरी वेळ)

जा.क्र.नांवाशमनपा/पशुसंवि/122/2025 दिनांक 18/03/2025

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणाऱ्या श्वानांना पकडुन शस्त्रक्रियेद्वारे निर्बिजीकरण व लसीकरण करुन (Dog Animal Birth Control) श्वानांच्या वाढणाऱ्या संख्येवर नियंत्रण ठेवणेसाठी प्रशिक्षित असलेल्या व नोंदणीकृत सेवाभावी संस्थेकडून खाजगीकरणातून अंमलबजावणी करण्यासाठी विहीत नमुन्यात ऑनलाईन निविदा मागवित आहे या निविदा फक्त महानगरपालिकेच्या वेबसाईट (https://mahaten ders.gov.in) वरुन खरेदी करता येईल .निविदेच्या अटी व शर्ती वरील वेबसाईटवर नमूद असतील निविदा फक्त इंटरनेट वरुन खरेदी करता येतील व इंटरनेटवरुन भरता येतील.सर्व कंत्राटदारांना Digital Signature चे रजिस्टेशन करणे अनिवार्य आहे.

करार पध्दतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत .निविदा सादर करु इच्छिणारी संस्था ही भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड, चेन्नई (Animal Welfare Board of India) यांचेकडील नोंदणीकृत असणे आवश्यक राहील.

निविदेची प्रत नियम व अटी हे (https://mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर आणि पशु शल्यचिकित्सक, पशु संवर्धन विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड पशु वैद्यकीय सर्व चिकीत्सालय, अशोकर नगर नांदेड येथे पहावयास मिळतील.

| अ.क्रं. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रकाशित करणे | 20/03/2025 | 15.00 |
| 2 | ई-निविदा डाऊनलोक करणे | 20/03/2025 | 15.00 |
| 3 | ई-निविदा भरणे | 20/03/2025 | 15.00 |
| 4 | ई-निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 27/03/2025 | 15.00 |
| 5 | ई-निविदा उघडणे | 28/03/2025 | 15.00 |

| अ. क्रं. | कामाचे नांव | बयाणा रक्कम | को-या निविदेची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| 01 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीतील अंतर्गत रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणाऱ्या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेद्वारे निर्बिजीकरण व लसीकरण करुन (Dog Animal Birth Control) श्वानांच्या वाढणाऱ्या संख्येवर नियंत्रण ठेवणेसाठी कंत्राटी पध्दतीवर खाजगी अभिकर्तांची नियुक्ती करणे बाबत . | 95,000/- | 5700/- | 24 महीने |

### नियम व अटी

1) कंत्राटदाराने ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर "हार्ड कॉपी" पशु शल्यचिकीत्सक, पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालय, अशोकर नगर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. कंत्राटदाराने खालीलप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे बंधनकारक आहे.

a) भारतीय जिवजंतु कलयाण बोर्ड (AWBI) यांच्याकडील प्राणी कलयाण संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

b) प्राणी प्रजनन प्रतिबंध नियम, 2023 मधील नियम 3 (2) अन्वये सदर कार्यक्रम करिता भारतीय प्राणी कल्याण मंडळ यांचेकडे नोंदणी करुन Certificate of Project Recognition सादर करणे.

c) अनुभव प्रमाणपत्र (किमान 1 वर्षाचे).

d) संस्थेकडील उपलब्ध असलेल्या पशु शल्यचिकीत्सकाची संख्या व शैक्षणीक, अनुभव प्रमाणपत्र.

e) ITR Turnover with CA certificate for last 3 years 2021-22, 2022-23 and 2023-24.

f) GST Certificate.

g) संस्थेस काळया यादीत टाकले नसल्या बाबत तसेच संस्थेवर कोणतीही कार्यवाही झालेले नसल्याचे बाबतचे स्वयंघोषणापत्र रु. 100/- च्या मुद्रांक शुल्कावर.

h) रु. 100/- च्या मुद्रांक शुल्कावर निविदे सोबत सादर केलेले कागदपत्रे बरोबर असल्या बाबत शपथपत्र.

i) EPF/ESIC नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे.

j) निविदा धारकाने कोरी निविदेची किंमत (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) ची रक्कम ONLINE Payment Gateway व्दारे भरणा करावी. त्याचा पुरावा निविदे सोबत जोडावा.

(मा.अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेने)

उप आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**प्रतिलीपी :**

1. नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
2. मा.संपादक, दैनिक उद्याचा मराठवाडा / दैनिक मायबोली यांना देवून विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सुचना आपल्या दि.20/04/2025 च्या वृत्तपत्रात 16 x 20 चौ. से.मी .आकारात कमीत कमी जागेत प्रसिध्द करुन बिलाच्या 2 प्रति शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.
3. ई-टेंडरींग विभाग/संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

उप आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

निविदा क्र.

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## पशु संवर्धन विभाग

**श्वान निर्बिजीकरण व लसीकरण**

## निविदा अर्ज

कामाचे नांव :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हददीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेव्दारे निर्बिजिकरण व लसीकरण करुन (Dog Animal Birth Control ) श्वानांच्या वाढणा-या संख्येवर नियंत्रण ठेवणेसाठी कंत्राटी पध्दतीवर खाजगी अभिकर्ताची नियुक्ती करणे बाबत.

निविदा धारकाचे नांव : ---------------------------------------------------

---------------------------------------------------

पता : ---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

**निविदा जाहिरात** :- जा.क्र.नांवाशमनपा/पशुसंवि/ /2025

दिनांक :- दिनांक / /2025

**निविदा अर्ज विक्री** :- दिनांक / /2025 ते दिनांक / /2025

कोरे निविदा अर्जाची किमंत रु. /-

**निविदा पत्रक**

**भाग-1**

**प्रति,**

**मा. आयुक्त,**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हददीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेव्दारे निर्बिजिकरण व लसीकरण करुन (Dog Animal Birth Control ) श्वानांच्या वाढणा-या संख्येवर नियंत्रण ठेवणेसाठी कंत्राटी पध्दतीवर खाजगी अभिकर्ताची नियुक्ती करणे बाबत.

**संदर्भ** :- आपली जाहिर, निविदा सुचना जा.क्र.नांवाशमनपा/पशुसंवि/ /2025 दिनांक / /2025

महोदय,

कृपया उपरोक्त विषयी संदर्भीय प्रसिध्द निविदा सुचने प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर, मोकाट/बेवारस फिरणाऱ्या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेद्वारे निर्बिजीकरण व लसीकरण (Animal Birth Control , Dog-Rule-2001) त्यांनतर आवश्यक औषधोपचार व श्वानांची शस्त्रक्रियेची जखम पुर्ण बरी होई पर्यंत देखभाल करण्याची व त्यांना पुर्ववत त्याच ठिकाणी सोडण्याची जबाबदारी स्विकारुन तसेच निविदेतील शर्तीच्या नियम व अटीनुसार, मी/आम्ही खालील प्रमाणे कागदपत्र सादर करीत आहे.

a) ------------------------------------------------------------------------------------

b) ------------------------------------------------------------------------------------

c) ------------------------------------------------------------------------------------

d) ------------------------------------------------------------------------------------

e) ------------------------------------------------------------------------------------

f) ------------------------------------------------------------------------------------

g) ------------------------------------------------------------------------------------

**निविदाधारक (अर्जदार),**

**नांव** ____________________________

**संस्थेचे नांव** ________________________

**पत्ता** ____________________________

**मो.क्र.** ____________________________

## निविदा पत्रक

## भाग :- 2

**प्रति,**

**मा. आयुक्त,**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हददीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेव्दारे निर्बिजिकरण व लसीकरण करुन (Dog Animal Birth Control ) श्वानांच्या वाढणा-या संख्येवर नियंत्रण ठेवणेसाठी कंत्राटी पध्दतीवर खाजगी अभिकर्ताची नियुक्ती करणे बाबत.

**संदर्भ :-** आपली जाहिर, निविदा सुचना जा.क्र.नांवाशमनपा/पशुसंवि/ /2025 दिनांक. / /2025

महोदय,

कृपया उपरोक्त विषयी संदर्भीय प्रसिध्द निविदा सुचने प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर,मोकाट/बेवारस फिरणाऱ्या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेद्वारे निर्बिजीकरणव लसीकरण करुन (Animal Birth Control, Dog-Rule-2001) त्यांनतर आवश्यक औषधोपचार व श्वानांची शस्त्रक्रियेची जखम पुर्ण बरी होई पर्यंत देखभाल करण्याची व त्यांना पुर्ववत त्याच ठिकाणी सोडण्याची जबाबदारी स्विकारुन, कायद्याचे अनुपालन करण्याचे अटीचे अधीन राहुन व निविदेतील अटी मान्य करुन वेळोवेळी दिलेल्या वरील आदेशांचे /नियमांचे व सुचनांचे पालन करण्याचे अटीवर प्रथम सहा महिन्यासाठी कंत्राट घेवू इच्छितो.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | मागणी केलेल्या कामाचे दर |
|---|---|---|
| 1 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणाऱ्या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेद्वारे निर्बिजीकरण व लसीकरण करुन (Dog Animal Birth Control) श्वानांच्या वाढणाऱ्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी शस्त्रक्रिया पश्चात श्वान घरात ठेवून औषधोपचार करणे, सकस आहार देणे व श्वानदंश प्रतिबंधक लसीकरण करणे, श्वान सुदृढ झाल्या नंतर स्वत:च्या वाहनातून पकडलेल्या ठिकाणी नेऊन सोडणे. | **प्रति श्वान**<br>रु.__________________/-<br>(अक्षरी रुपये ____________<br>__________________<br>__________________) |

**निविदाधारक (अर्जदार),**

**नांव** ____________________

**संस्थेचे नांव** ____________________

**पत्ता** ____________________

**मो.क्र.** ____________________

दाखल करण्याची अंतिम
दिनांक :      /      /2025
वेळ :

# दर निश्चिती निविदा फॉर्म

| अ.क्रं. | विवरण | प्रति श्वान | दर<br>रु. पैसे |
|---|---|---|---|
| 1. | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणाऱ्या श्वानांना पकडून शस्त्रक्रियेद्वारे निर्बिजीकरण व लसीकरण करुन (Dog Animal Birth Control) श्वानांच्या वाढणाऱ्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी शस्त्रक्रिया पश्चात श्वान घरात ठेवून औषधोपचार करणे, सकस आहार देणे व श्वानदंश प्रतिबंधक लसीकरण करणे, श्वान सुदृढ झाल्या नंतर स्वत:च्या वाहनातून पकडलेल्या ठिकाणी नेऊन सोडणे. | प्रति श्वान | अंकात रु.______________/-<br><br>(अक्षरी रुपये ______________<br>______________<br>______________) |

निविदाधारकाची स्वाक्षरी
स्टॅम्पसह

## नियम व अटी

1) काम करण्याचा कालावधी प्रथम दोन वर्ष राहील.

2) श्वान पकडण्यासाठी वाहन कंत्राटदार स्वतः उपलब्ध करुन घ्यावे. (गाडीचे सर्व कागदपत्र जमा करावे)

3) भारतीय जिवजंतु कल्याण बोर्ड, चेन्नई (AWBI) यांचे नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील. 1 वर्ष कामाचा अनुभव आवशक आहे. तसेच प्राणी प्रजनन प्रतिबंध नियम 2023 च्या तरतूदीचे पालन करावे लागेल.

4) नांदेड शहरातील नागरीकांनी मनपा हद्दीत 24 तासात केंव्हाही मोकाट श्वानांची किंवा पिसाळलेल्या श्वानांची तक्रारी केल्यास, तक्रार प्राप्त होतास त्वरीत त्याचे निपाटारा करणे संस्थाचालकास बंधनकारक राहील. तक्रारीचे निवारण संस्थेने त्वरीत न केल्यास संस्थेविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

5) शस्त्रक्रीया करणारे डॉक्टर अनुभवी तसेच योग्य पशु शल्यचिकित्सक शासन मान्य B.V.Sc.& AH. पदवी परिक्षा पास असावेत. व VCI Reg. प्रमाणपत्रा असणे आवश्यक राहील. (शैक्षणिक प्रमाणपत्राच्या व अनुभवाची सत्यप्रती सादर करणे बंधनकारक राहिल)

6) सह कर्मचारी/कॅचर्स/कंपौंडर हे योग्य शिक्षीत व प्रशिक्षित असावेत.

7) सर्व उपकरणे व औषधीचा खर्च कंत्राटदारास करावा लागेल.

8) श्वानाचे थंडी/ऊन/पाऊस या पासून संरक्षण करणे बंधनकारक राहील.

9) श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियेसाठी ॲनिमल बर्थ डॉग रुल-2001 नियमावलीचे पालन करावे लागेल.

10) श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिसरअंतर्गत तांत्रिक कामे नोंदणीकृत व तज्ञ पशुवैदयकामार्फत करुन घ्यावी लागतील.

11) श्वान पकडून आणल्यानंतर शस्त्रक्रियेसाठी पशुवैदयकांना मदत करणे. श्वान निवारागृहात पाठविण्यापर्यंतची कामे, निवारागृह स्वच्छ ठेवणे श्वानांचे पुनर्वसन करणे, श्वानास खादय देणे हे अतांत्रिक कामे पशुवैदयकांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेला करावे लागेल.

12) शस्त्रक्रियेनंतर ड्रेसींग, पोस्ट ऑपरेटीव केइर, एँटी बायोटीक्स इंजेक्शन, एँटी रेबीज इंजेक्शन इत्यादी तांत्रिक कामे पशुवैद्यकामार्फत करावी लागतील.

13) धोकादायक, पिसाळलेले व दुरुस्त न होवू शकणारे, रोगग्रस्त, जखमी श्वान इंजेक्शनव्दारे मारण्यासाठी डॉग रुल -2001 मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

14) श्वान पकडण्याचे, शस्त्रक्रियेचे, इंजेक्शनव्दारे मारण्यात आलेल्या श्वानांचे रेकॉर्ड अदययावत ठेवावे लागेल.

15) शस्त्रक्रिया केल्यानंतर श्वाने जननेंद्रीय फुरमॅलीनच्या द्रवात मोजणीपर्यंत बुडवून ठेवावा.

16) पकडलेल्या कुत्र्यांची नोंद एका नोंदवहीत करावी लागेल व त्यामध्ये विभाग/वस्तीचे नांव, पकडल्याची तारीख व वेळ, त्या विशिष्ट दिवशी श्वान पथकातील व्यक्तींची नांवे व पकडलेल्या कुत्र्यांचे वर्णन इत्यादी बाबींची नोंद कंत्राटदारास काटेकोरपणे करावी लागेल. श्वानांच्या शस्त्रक्रिया उपरांत प्रथमोपचार दरम्यान त्यांना प्रतिजैविक, वेदनाशामक औषधी, आयव्हरमेक्टीनचे इंजेक्शन आणि सोडण्यापूर्वी रेबिज प्रतिबंधक लसीकरण करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. याबाबत सर्व नोंदी ठेवाव्या लागतील. (SOP प्रमाणे करावे लागेल.)

17) गर्भधारण झालेल्या मादीचे निर्बिजीकरण केले जाणार नाही. तसेच त्यांना प्रसवाचे वेदना सुरु होईपावेतो सोडून देण्यात येईल. या बाबतीत निर्बिजीकरण, शस्त्रक्रियेचा मोबदला कंत्राटदारास मिळणार नाही.

18) संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन दयावे लागेल कामगार/कर्मचारी कायद्याचे पालन करावे/त्यांचा विमा/संरक्षण इत्यादी बाबी कंत्राटदाराकास बंधनकारक राहतील.

19) कंत्राटदारांकडे काम करणाऱ्या कामगार कर्मचाऱ्यांना महानगरपालिका प्रशासन सेवेत कोणत्याही पदावर नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही. व महानगरपालिका सेवेत समावून घेतले जाणार नाही. अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही. गरजे प्रमाणे महानगरपालिका प्रशासनाचे कर्मचारी/अधिकारी योग्य मदत सहकार्य करतील.

20) नियमानुसार बॉन्डवर पेपरवर लेखी करारनामा करून दयावा लागेल.

21) करारनामा झाल्यानंतर कार्यारंभ आदेशानंतर तात्काळ कामास सुरुवात करावी लागेल.

22) निविदा दाखल केल्यानंतर काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अथवा कंत्राटाचे काम मुदतीपूर्व सोडण्यात आल्यास अनामत रक्कम जप्त करुन,निविदा प्रक्रियेसाठी झालेल्या खर्चाची रक्कम वसूल करण्यात येईल.

23) दैनिक कामाचा अहवाल पशु शल्य चिकीत्सक, नांदेड वाघाळा शहर महापालिका, नांदेड यांच्यामार्फत सादर करावा लागेल.

24) कंत्राटदारास श्वान निर्बीजीकरण व लसीकरण चे देयक महापालिकेचे पशु शल्यचिकीत्सक यांनी प्रमाणित केल्यानंतर देण्यात येईल.

25) श्वाना संबंधी प्राणी संरक्षण अधिनियम व इतर लागू असलेले सर्व संबंधीत नियम व अधिनियमातील अटींचे तंतोतंत पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

26) प्रथम कामाची मुदत दोन वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात येईल व कामाचे स्वरुप तसेच काम समाधानकारक असले तर मुदत वाढवून देण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

27) मोकाट कुत्र्यांची वाहतूक करतांना कामगारांना अथवा नागरीकांना काही नुकसान झाल्यास, अपघात/इजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

28) देयक अदा करण्यासाठी बीले सादर करतांना केस पेपर्स, शस्त्रक्रिया रजिष्टर, प्रत्येक पानावर शस्त्रक्रिया करणा-या पशुवैद्यकाची सही शिक्का, लसीकरण स्टीकर्स आवश्यक राहतील.

29) सदरील कार्य हे अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे व सार्वजनिक हिताचे असल्यामुळे कंत्राटदाराला कोणत्याही परिस्थितीत महानगरपालिका, नांदेडला सबळ कारणासह पुर्व सुचना न देता काम बंद करता येणार नाही अथवा एकतर्फी कंत्राट सोडून देता येणार नाही. तसे केल्यास कंत्राटदाराची सुरक्षा रक्कम व देय असलेली सर्व बिले जप्त करण्यात येवून त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल व प्रसंगी कंत्राटदारा विरुध्द महापालिकेची फसवणूक केली म्हणून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

30) वरिल प्रमाणे कार्य पध्दतीत त्रुट किंवा अनियमितता आढळल्यास व काम समाधानकारक नसल्यास त्याच क्षणी काम बंद करण्याचे अधिकार आयुक्तास राहील.

31) संस्थेने केलेल्या कामाचे देयक मनपा कडील निधीच्या उपलब्धतेनुसार अदा केले जातील.

32) देयक अदायीच्या विलंबामुळे काम बंद ठेवता येणार नाही. काम बंद पाडल्यास संस्थेचा करार रद्द करून संस्थस काळया यादीत टाकण्यात येईल.

33) कंत्राटदाराच्या कामाबाबत तक्रार असल्यास व काम समाधानकारक न आढळयास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचा किंवा कंत्राट रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड याच्याकडे सुरक्षित आहे. उपरोक्त सर्व अटी व वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

34) कामाचे स्वरुप किंवा वार्ड निहाय / तक्रार निहाय आयुक्त यांचे सुचनेनुसार करणे बंधनकारक राहील.

35) कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे /नाकारण्याचे अधिकार आयुक्तांनी राखुन ठेवलेले आहेत.

36) निविदा संबंधी अधिक माहितीसाठी पशु शल्यचिकित्सक, पशु संवर्धन विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड पशु वैद्यकीय सर्व चिकीत्सालय, अशोक नगर नांदेड या ठिकाणी कार्यालयीन वेळेत भेटावे किंवा 8888892063 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

**(मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**उप आयुक्त**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.